| सोलापूर विद्यापीठ<br>परीक्षा व मूल्यमापन विभाग<br>सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,<br>सोलापूर - ४१३ २५५<br>ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३/७४/७८/७९<br>फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०<br>संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>ई-मेल: dbee@sus.ac.in | सोलापूर विद्यापीठ<br>॥ विद्यया संपन्नता ॥<br>NAAC Accredited-2015<br>'B' Grade (CGPA 2.62) | Solapur University<br>Examinations and Evaluation Section<br>Solapur-Pune National Highway, Kegaon,<br>Solapur-413 255<br>EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79<br>Fax No.0217-2744770<br>Web Site : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in<br>email id: dbee@sus.ac.in |
|---|---|---|

# परिपत्रक

माहे ऑक्टो/नोव्हें २०१७ च्या पासून बी. कॉम/बी. एस्सी च्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने वितरित करण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी प्रत्येक परीक्षा केंद्रासाठी १ को-ऑर्डिनेटर व १ शिपाई मंजूर केला आहे. परंतु एका तासात प्रश्नपत्रिका डाऊनलोड करणे, झेरॉक्स करणे, चार पानी प्रश्नपत्रिका असल्यावर स्टेपल करणे व विद्यार्थ्यांपर्यत प्रश्नपत्रिका वेळेत पोहचवणे इ. कामे विचारात घेता, विद्यार्थी संख्येनुसार वाढीव स्टाफ मंजूर करावा असे महाविद्यालयांनी कळविले होते. त्यानुसार या संदर्भात दि.२३/१/२०१८ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमधील ठराव क्र. ७/६ अन्वये गठित केलेल्या समितीने खालीलप्रमाणे शिफारस केलेली होती.

**ठराव : ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणालीसाठी तीन किंवा तीन पेक्षा जास्त विद्याशाखेच्या परीक्षा असतील अशाच परीक्षा केंद्राना एक लिपिक अधिकचा घेण्यास मान्यता देण्यात आली.**

तद्नंतर उक्त बाब दि.१३/०४/२०१८ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या विषय क्र.१३ नुसार विचारार्थ सादर केले असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.

"ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणालीकरीता वाढीव स्टाफ मंजूर करण्यासाठी दि.२३/१/२०१८ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार गठीत समितीच्या शिफारशीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४८(२) च्या अनुषंगाने परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने केलेली शिफारस स्वीकारून मार्च २०१८ च्या परीक्षेपासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली ".

सबब, **ज्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणालीसाठी तीन किंवा तीन पेक्षा जास्त विद्याशाखेच्या परीक्षा असतील अशाच परीक्षा केंद्राना एक लिपिक अधिकचा घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.** उक्त ठरावाची अंमलबजावणी ही माहे मार्च/एप्रिल २०१८ च्या परीक्षेपासून ज्या परीक्षा केंद्रावर ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणाली कार्यान्वीत आहे त्यांच्याकरीता करावयाची आहे. सदरची बाब मा. प्राचार्य/मा. प्राचार्या/मा. संचालक यांनी सर्व संबंधीत अंतर्गत/बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या निदर्शनास सत्वर आणून द्यावी.

Digitally signed by PATIL BHATUPRASAD PRABHAKAR
DN: cn=PATIL BHATUPRASAD PRABHAKAR, c=IN, st=MAHARASHTRA, o=SOLAPUR UNIVERSITY, ou=EXAMINATIONS AND EVALUATION,
serialNumber=1c9f78a35972bc358358c30906be0f2f7473da51a8fe8bf8b5ca214dbfe20483
Reason: Circular
Date: 2018.05.16 12:29:11 +05'30'

**संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. : सोविसो/परीक्षा व मूल्यमापन/परिपत्रक/२०१८/१२६९ दि.१६/०५/२०१८

प्रत माहितीस्तव :

१. मा. कुलगुरु कार्यालय, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२. मा. कुलसचिव कार्यालय, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
३. मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकूले विद्यापीठ परिसर
४. मा. प्राचार्य/मा. प्राचार्या/मा. संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये